


सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - १८५ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. २८ ऑगस्ट २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

# ‘३२० भारतीय अद्यापही बेपत्ता, तर ४०० जण सुरक्षित’

## नेपाळमधील पूरस्थितीबाबत परराष्ट्र मंत्रालयाने दिली माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ नवी दिल्ली–** नेपाळमध्ये आलेल्या भीषण महाप्रलयात आत्तापर्यंत तब्बल ५३८ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती नेपाळ सरकारकडून देण्यात आली आहे. तसेच अद्यापही शेकडो नागरिक बेपत्ता आहेत. या महापुरामुळे अनेक गावं भुईसपाट झाले आहेत. नेपाळमधील या महापुराच्या घटनेनंतर संपूर्ण जगभरातून चिंता व्यक्त करण्यात आली आहे.

नेपाळमध्ये आलेल्या विनाशकारी पुरामुळे मोठी आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाली असून, तेथील ३२० भारतीय नागरिकांशी अद्याप संपर्क होऊ शकलेला नाही. याशिवाय, इतर देशांचे नागरिकत्व असलेल्या परंतु कैलास मानसरोवर यात्रेसाठी गेलेल्या सुमारे १०० भारतीय वंशाच्या व्यक्तींशीही संपर्क तुटलेला आहे. या पार्श्वभूमीवर परराष्ट्र मंत्रालयाचे नियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत आहे. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी दिलेल्या माहितीनुसार, चीनच्या सीमेवरील तिबेट प्रदेशात





अडकलेले ४०० भारतीय नागरिक पूर्णपणे सुरक्षित असून ते त्यांच्या कुटुंबीयांच्या आणि बीजिंगमधील भारतीय दूतावासाच्या संपर्कात आहेत. चीनमधील स्थानिक प्रशासनाच्या मदतीने या नागरिकांना सुरक्षित बाहेर काढण्याचे काम सुरू आहे.

पूरग्रस्त भागातून दिलासादायक बातमी म्हणजे काठमांडूमध्ये पोहोचलेले तामिळनाडूतील २१ भारतीय नागरिक आज सुखरूप दिल्लीत दाखल झाले आहेत. भारतीय राजदूतांनी काठमांडू येथे त्यांची भेट घेऊन त्यांच्या प्रकृतीची चौकशी केली होती. याशिवाय, त्रिशुली वन जलविद्युत प्रकल्पात अडकलेल्या ६३ भारतीय कर्मचाऱ्यांना काल सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले आहे, तर चीनच्या बाजूला अडकलेले ९६ भारतीय नागरिक जमिनीमार्गे नेपाळमध्ये सुरक्षित पोहोचले असून त्यांच्या सुटकेचे प्रयत्न सुरू आहेत.

आपत्तीच्या पहिल्याच दिवसापासून भारताने नेपाळला मानवतावादी मदत पुरवण्यास सुरुवात केली आहे. २६ ऑगस्टच्या संध्याकाळी पाठवलेल्या पहिल्या विमानाद्वारे तात्पुरती निवारागृहे, ब्लँकेट्स, स्वच्छता किट, सौर दिवे आणि औषधांसह १० टन मदत साहित्य रवाना करण्यात आले. त्यानंतर २७ ऑगस्ट रोजी सकाळी १०:३० वाजता पाठवलेल्या दुसऱ्या विशेष विमानातून तंबू, वॉटर पंप, किचन सेट, जनरेटर आणि खाद्यपदार्थांसह ३७.५ टन अतिरिक्त साहित्य पाठवण्यात आले आहे. नेपाळ सरकारच्या विनंतीनुसार, जमिनीवरील परिस्थितीचा आढावा घेऊन आवश्यक उपकरणांची निश्चिती करण्यासाठी भारत सरकार एक बोगदा बचाव पथक आणि वैद्यकीय पथक पाठवत आहे. तसेच, बाधित भागांमधील वाहतूक व दळणवळण लवकरात लवकर पूर्ववत करण्यासाठी बेली ब्रिज आणि तांत्रिक पथके पाठवण्याचा प्रस्तावही भारताने दिला आहे.

# पंतप्रधान मोदींचा बच्चे कंपनी सोबत रक्षाबंधनाचा सण आनंदात साजरा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८नवी दिल्ली**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी, २८ ऑगस्ट रोजी रक्षाबंधनाचा सण मुलांसोबत आनंदात साजरा केला. पंतप्रधानांच्या ७, लोक कल्याण मार्ग येथील निवासस्थानी यानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अनेक मुलांनी सहभागी होत मोदींच्या मनगटावर राखी बांधली. पंतप्रधानांनीही मुलांशी मनमोकळेपणाने संवाद साधत त्यांच्यासोबत रक्षाबंधनाचा आनंद घेतला.या भेटीदरम्यान मोदी मुलांसोबत अगदी सहज आणि आनंदी वातावरणात दिसून आले. मुलांशी संवाद साधताना त्यांनी त्यांच्यासोबत हाय-फाइव्ह केले. या प्रसंगाचे फोटो आणि व्हिडिओ पंतप्रधानांच्या सोशल मीडिया हँडलवरून शेअर करण्यात आले असून, त्यातील काही क्षणांनी लक्ष वेधून घेतले आहे.



रक्षाबंधनाच्या निमित्ताने पंतप्रधान मोदी यांनी देशवासीयांनाही शुभेच्छा दिल्या. भाऊ-बहिणीमधील प्रेम, स्नेह आणि परस्पर विश्वासाचे प्रतीक म्हणून या सणाचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. आपल्या एक्स हँडलवरील संदेशात त्यांनी रक्षाबंधनाचा सण सर्वांच्या आयुष्यात सुख, समृद्धी आणि यश घेऊन येवो, अशी शुभेच्छा व्यक्त केली. तसेच स्नेह, आपुलकी आणि विश्वासाचे बंध कायम मजबूत राहावेत, अशी भावना व्यक्त केली.दरम्यान, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनीही मुलांसोबत रक्षाबंधन साजरे केले.नवी दिल्लीतील आपल्या निवासस्थानी झालेल्या या कार्यक्रमाचे फोटो शेअर करत त्यांनी मुलांसोबत सणाचा आनंद आणि स्नेह वाटून घेतल्याचे सांगितले. रक्षाबंधन हा भाऊ-बहिणींमधील अतूट प्रेम आणि विश्वासाचा सण असल्याचे नमूद करत त्यांनी महिलांचा आदर, सुरक्षा आणि सन्मान यासाठी समाजाने अधिक संवेदनशील राहण्याचे आवाहन केले. राजनाथ सिंह यांनी या सणाच्या माध्यमातून महिलांचा आत्मसन्मान आणि सक्षमीकरणाबाबत समाजात अधिक जागरूकता निर्माण व्हावी, अशी अपेक्षाही व्यक्त केली. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी मुलांसोबत रक्षाबंधन साजरे करत देशवासीयांना सणाच्या शुभेच्छा दिल्या.




## राजकीय नेत्यांचे रक्षाबंधन!

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापासून राज ठाकरे, धनंजय मुंडे, आशिष शेलार यांच्यासह अनेक नेत्यांनी रक्षाबंधन साजरे केले.

# नाशिकहून ४५० टन कांदा दिल्लीला! ग्राहकांना मिळणार मोठा दिलासा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ नाशिक–** कांद्याच्या वाढत्या दरामुळे त्रस्त झालेल्या दिल्लीतील ग्राहकांना दिलासा देण्यासाठी केंद्र सरकारने मोठी पावले उचलली आहेत. नाशिक जिल्ह्यातील लासलगाव येथून तब्बल ४५० टन कांदा घेऊन निघालेली विशेष ‘कांदा एक्सप्रेस’ शुक्रवारी सकाळी दिल्लीतील आदर्श नगर रेल्वे स्थानकावर दाखल झाली. राजधानीत वाढलेल्या कांद्याच्या किमती नियंत्रणात आणण्यासाठी हा कांदा ग्राहकांना ३५ रुपये प्रति किलो या अनुदानित दराने उपलब्ध करून दिला जाणार आहे.

लासलगाव ही आशियातील सर्वात मोठी कांद्याची घाऊक



बाजारपेठ मानली जाते. येथून २१ डब्यांची विशेष मालगाडी कांदा भरून बुधवारी दुपारी ३:१० वाजता दिल्लीच्या दिशेने रवाना झाली होती. दिल्लीतील बाजारपेठांमध्ये कांद्याचे दर ५० रुपयांपर्यंत पोहोचले असून, देशातील काही शहरांमध्ये हाच दर ५५ ते ६० रुपये प्रति किलोपर्यंत गेला आहे. या पार्श्वभूमीवर केंद्राच्या निर्णयामुळे सामान्य ग्राहकांना काहीसा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. शहरी भागातील कांद्याच्या वाढत्या किमतींवर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्र सरकारने आपल्या बफर स्टॉकमधून दिल्लीला एकूण ८४० टन कांदा पाठवण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचाच एक भाग म्हणून ४५० टन कांदा विशेष रेल्वेने राजधानीत आणण्यात आला आहे. बाजारातील वाढलेल्या दराला पर्याय म्हणून हा कांदा अनुदानित किमतीत विक्रीसाठी उपलब्ध केला जाणार आहे. लासलगाव रेल्वे स्थानकाचे व्यवस्थापक प्रितेश दुबे यांनी सांगितले की, ‘कांदा एक्सप्रेस’च्या माध्यमातून सुमारे ४५० टन कांदा दिल्लीला पाठवण्यात आला आहे. ही विशेष रेल्वे दिल्लीजवळील आदर्श नगर स्थानकावर पोहोचणार असल्याचे त्यांनी सांगितले होते. कांद्याची वाहतूक शक्य तितक्या लवकर पूर्ण करून तो नियोजित ठिकाणी पोहोचवण्यासाठी प्रयत्न करण्यात आल्याचेही दुबे यांनी स्पष्ट केले.

# आदिवासी विद्यार्थी अमरावतीहून पायीच निघाले यवतमाळच्या दिशेने,

## मागण्या मान्य न झाल्याने आंदोलन तीव्र..

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**
अमरावती: विविध मागण्यांसाठी गेल्या अनेक दिवसांपासून आंदोलन करणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांनी आज आक्रमक पवित्रा घेतला. आदिवासी विकासमंत्री डॉ. अशोक उईके यांच्या यवतमाळ येथील निवासस्थानासमोर शुक्रवारपासून आंदोलन करण्याचा इशारा विद्यार्थ्यांनी दिला आहे. शेकडो विद्यार्थी यवतमाळच्या दिशेने पायीच निघाले आहेत. त्यांची समजूत काढण्यासाठी खासदार बळवंत वानखडे, माजी आमदार वीरेंद्र जगताप यांच्यासह जिल्हाधिकारी आशिष येरेकर आणि ग्रामीण पोलीस अधीक्षक निकेतन कदम हे देवगाव मार्गावर पोहचले होते.

आदिवासी विद्यार्थ्यांनी येथील आदिवासी विकास विभागाच्या अपर



आयुक्तालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले होते. विद्यार्थ्यांच्या मागण्यांबाबत प्रकल्प अधिकारी, अपर आयुक्त, उपायुक्त आणि सहायक आयुक्त स्तरावरील अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांशी चर्चा केली होती. पण, त्यातून तोडगा निघू शकला नाही. १४ ऑगस्टचा शासन निर्णय रद्द करावा, वसतिगृहांची क्षमता वाढवावी, जुना अध्यादेश रद्द करावा, जिल्ह्यात स्वतंत्र वसतिगृह सुरू करावे, केंद्रिय स्वयंपाकगृह बंद करावे, तसेच १२ हजार ५०० अधिसंख्य पदांची भरती तसेच ८५ हजार रिक्त पदे भरावीत, सर्पदंश आणि प्रकृतीकडे दुर्लक्षामुळे मृत्यूमुखी पडलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या पालकांना एक कोटी रुपयांची आर्थिक मदत द्यावी, अशा मागण्या विद्यार्थ्यांनी केल्या आहेत. विविध मागण्यांसाठी गेल्या अनेक दिवसांपासून आंदोलन करणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांनी आज आक्रमक पवित्रा घेतला. आदिवासी विकासमंत्री डॉ. अशोक उईके यांच्या यवतमाळ येथील निवासस्थानासमोर शुक्रवारपासून आंदोलन करण्याचा इशारा विद्यार्थ्यांनी दिला आहे.आंदोलक विद्यार्थ्यांची समजूत काढण्यासाठी काँग्रेसचे खासदार बळवंत वानखडे, माजी आमदार वीरेंद्र जगताप हे देवगाव मार्गावर पोहचले. पायी न जाता खासगी वाहनांमधून यवतमाळ येथे पोहचता येऊ शकते, त्याची व्यवस्था आम्ही करतो, असे त्यांनी सांगून पाहिले, पण ते पायीच जाण्यावर अडून होते. दरम्यान, जिल्हाधिकारी आशिष येरेकर आणि ग्रामीण पोलीस अधीक्षक निकेतन कदम हे विद्यार्थ्यांसोबत चर्चा करण्यासाठी मार्गावरील सांगुलवाडा येथे पोहचले. विद्यार्थ्यांनी पायी चालत जाणे योग्य नाही. स्वतः आदिवासी विकास मंत्री या ठिकाणी येण्यास तयार आहेत, तोपर्यंत आपण वाट पाहू, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले, पण, विद्यार्थी पायी चालत जाण्यावर ठाम आहेत. बाभुळगावमार्गे यवतमाळला पोहचण्याचा त्यांचा प्रयत्न आहे.

# नेपाळमधील महापुराचे पाणी भारतातही पोहोचले

## उत्तर प्रदेशातील गंडक नदीत आढळले ३ मृतदेह

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २८ नवी दिल्ली:**
हिमालय पर्वतामध्ये बुधवारी झालेले भूस्खलन आणि नेपाळ-तिबेट सीमेवरील रसुवागढी येथे धडकलेला विनाशकारी पूरप्रवाह यांच्यात अवघ्या सात मिनिटांचे अंतर होते. मात्र, पुराचा हा मार्ग प्रवाहाच्या दिशेने सुमारे २०० किमीपर्यंत पसरला आहे. नेपाळमधून वाहत आलेले तीन मृतदेह गुरुवारी उत्तर प्रदेशातील महाराजगंज जिल्ह्यात गंडक नदीत आढळून आले. भारत-नेपाळ सीमेलगत असलेल्या चितवन जिल्ह्यात सर्वाधिक म्हणजे १३२ मृतदेह सापडले आहेत.

भूस्खलनाचा पहिला भूकंपीय संकेत सकाळी ८:३७ वाजता नोंदवला गेला. सीमा सुरक्षा दलाच्या फुटेजमध्ये दिसले की,



अरुंद दरीतून प्रचंड वेगाने येणारा पाण्याचा लोट पाहून लोक जीव वाचवण्यासाठी पळत सुटले होते. या सात मिनिटांच्या अंतरावरून आपत्तीचा वेग किती प्रचंड होता हे दिसून येते, परंतु लोकांना सुरक्षित स्थळी हलवण्यासाठी हा वेळ पुरेसा नव्हता. नेपाळच्या पूर व्यवस्थापन प्राधिकरणाला हे पाणी भोटे कोशी नदीत शिरल्यानंतरच या आपत्तीची माहिती मिळाली.

**भारतातही आढळले मृतदेह**

नारायणी नदी पुढे जाऊन ’गंडक’ नदी म्हणून ओळखली जात असल्याने पुराचा हा मार्ग भारतातही पुढे गेला. सशस्त्र सीमा बल पथकांनी महाराजगंज येथे दोन महिला आणि एका पुरुषाचे मृतदेह बाहेर काढले.

संपादकीय ......

# नारळी पौर्णिमा आणि रक्षाबंधन

श्रावण पौर्णिमा म्हणजे नात्यांतील प्रेम आणि कृतज्ञता व्यक्त करणाऱ्या समृद्ध भारतीय परंपरांचा संगम. रक्षाबंधनापासून नारळी पौर्णिमेपर्यंतचा हा उत्सव मानवी नात्यांसोबतच निसर्ग, उपजीविका आणि सहजीवनाचे महत्त्व अधोरेखित करतो.

आपली धार्मिक अन सांस्कृतिक परंपरा निसर्ग, उपजीविका, सामाजिक बांधिलकी आणि मानवी कृतज्ञतेशी घट्ट जोडलेली आहे. श्रावण पौर्णिमा हा त्याच सांस्कृतिक समृद्धीचा दिवस. देशाच्या विविध भागांत हा दिवस रक्षाबंधन, राखी पौर्णिमा, श्रावणी पौर्णिमा अशा विविध नावांनी साजरा होतो. महाराष्ट्राच्या कोकण किनारपट्टीवर या दिवसाला विशेष महत्त्व आहे. समुद्राला जीवनाचा आधार मानणाऱ्या कोळी समाजासाठी हा दिवस 'नारळी पौर्णिमा' म्हणून श्रद्धा, परंपरा आणि व्यवसायाशी जोडला गेला आहे. किनारी भागातील नारळी पौर्णिमेची परंपरा म्हणूनच आजही लोकजीवनाचा महत्त्वपूर्ण सांस्कृतिक ठेवा आहे.

कोळी समाजासाठी समुद्र उपजीविकेचा आधार आहे. पिढ्यान्पिढ्या मासेमारीवर जीवन जगणाऱ्या या समाजाने समुद्राला दैवताचे स्थान दिले आहे. श्रावण पौर्णिमेला कोळी बांधव समुद्राची पूजा करतात. नारळ, फुले आणि नैवेद्य अर्पण करून समुद्र शांत राहावा, नौका सुरक्षित राहाव्यात आणि मासेमारीचा हंगाम सुखकर जावा, अशी प्रार्थना केली जाते. नारळी पौर्णिमेला समुद्राला नारळ अर्पण करण्यामागे समुद्रदेवतेचा आशीर्वाद मिळावा, समुद्रातील संकटांपासून संरक्षण मिळावे आणि मासेमारीचा काळ समृद्ध जावा, अशी श्रद्धा आहे. या परंपरेतून निसर्गाकडून मिळणाऱ्या साधनसंपत्तीबद्दल कृतज्ञ राहण्याचा संदेशही मिळतो.

नौका समुद्रात उतरवण्यापूर्वी त्यांची साफसफाई, रंगरंगोटी आणि पूजा केली जाते. सुरक्षित आणि भरभराटीचा हंगाम सुरू व्हावा, हीच त्यामागची भावना असते. पारंपरिक पोशाख, कोळी गीते आणि नृत्य यामुळे किनारपट्टीवर उत्सवी वातावरण निर्माण होते. या दिवशी नारळी भात, नारळाच्या करंज्या आणि इतर गोड पदार्थ तयार केले जातात. नारळ हा कोकणी खाद्यसंस्कृतीचाही अविभाज्य भाग आहे. त्यामुळे सणाच्या निमित्ताने धार्मिक श्रद्धा, स्थानिक खाद्यपरंपरा आणि कौटुंबिक आनंद यांचा सुंदर संगम घडतो. नारळी पौर्णिमेचा सर्वात महत्त्वाचा संदेश म्हणजे कृतज्ञता आणि सहजीवन. समुद्र देतो म्हणून त्याचा उपभोग घ्यायचा; पण त्याचे रक्षण करण्याची जबाबदारीही स्वीकारायची, हा या परंपरेचा गाभा आहे. कोळी समाजाच्या जीवनात समुद्र हा अन्न, रोजगार आणि संस्कृतीचा आधार आहे. त्यामुळे समुद्राची पूजा म्हणजे प्रत्यक्षात निसर्गशक्तीचा सन्मान होय.

श्रावण पौर्णिमेलाच रक्षाबंधन साजरे केले जाते. त्यामुळे एका बाजूला भाऊ-बहिणीच्या प्रेमाचे आणि संरक्षणाचे प्रतीक असलेले रक्षाबंधन, तर दुसऱ्या बाजूला समुद्र आणि उपजीविकेचे नाते जपणारी नारळी पौर्णिमा, असा या दिवसाचा व्यापक सांस्कृतिक आविष्कार दिसतो. रक्षाबंधन हा भारतीय संस्कृतीतील प्रेम, विश्वास, आपुलकी आणि परस्पर जबाबदारी जपणारा महत्त्वाचा सण आहे. राखी बांधणे आणि भावाने तिच्या रक्षणाचे आश्वासन देणे, एवढ्यापुरतीच या सणाची व्याप्ती मर्यादित नाही. काळानुसार रक्षाबंधनाच्या परंपरेचा अर्थही व्यापक झाला आहे. रक्ताच्या नात्यांपलीकडे जाऊन मित्र-मैत्रिणी, गुरू-शिष्य, सामाजिक बांधिलकीची नाती आणि समाजातील विविध घटकांमधील परस्पर विश्वास व्यक्त करण्याचे माध्यम म्हणूनही राखीचे महत्त्व वाढले आहे. भारतीय परंपरेत राखी ही केवळ धाग्याची वस्तू नसून नात्यांना जोडणारे आणि संकटाच्या काळात एकमेकांच्या पाठीशी उभे राहण्याची आठवण करून देणारे प्रतीक मानले जाते.रक्षाबंधनात माणूस आपल्या प्रिय व्यक्तीच्या सुरक्षिततेची जबाबदारी स्वीकारतो, तर नारळी पौर्णिमेत कोळी समाज आपल्या उपजीविकेचा आधार असलेल्या समुद्राच्या सामर्थ्याचा आदर करून त्याच्या कृपेची प्रार्थना करतो. अशाप्रकारे एकाच पौर्णिमेला साजऱ्या होणाऱ्या या दोन परंपरा मानवी नात्यांचे रक्षण आणि निसर्गाशी असलेल्या नात्याचे जतन, या दोन्ही मूल्यांची जाणीव करून देतात. बदलत्या काळात रक्षाबंधनाचा हा व्यापक अर्थ समजून घेणे अधिक महत्त्वाचे ठरते; कारण संरक्षण ही केवळ एका व्यक्तीची दुसऱ्या व्यक्तीबद्दलची जबाबदारी नसून कुटुंब, समाज आणि निसर्गाप्रति असलेले आपले कर्तव्यही आहे.

# हजारो लाडक्या बहिणींच्या राख्यांनी सजले रवि राणांचे मनगट

## मानधन ३ हजार करण्याची मुख्यमंत्र्यांकडे मागणी




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती :**

रक्षाबंधनाच्या पावन पर्वानिमित्त शंकरनगर येथे आयोजित भव्य सामूहिक रक्षाबंधन सोहळ्यात अमरावतीचे आमदार रवि राणा यांना हजारो लाडक्या बहिणींनी राख्या बांधून शुभेच्छा दिल्या. सकाळी ९ वाजता सुरू झालेला हा उत्साहपूर्ण व भावनिक सोहळा सायंकाळी ६ वाजेपर्यंत सुरू होता. दिवसभर महिलांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला.यावेळी बोलताना आ. रवि राणा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे महत्त्वपूर्ण मागणी केली. आमदार आणि खासदारांचे पगार कमी करून राज्यातील लाडक्या बहिणींना मिळणारे प्रतिमहिना १,५०० रुपयांचे मानधन वाढवून ३,००० रुपये करण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली. महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी आणि त्यांच्या कुटुंबांना अधिक आर्थिक आधार मिळावा, यासाठी मानधनवाढ आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.लाडक्या बहिणींचे प्रेम आणि आशीर्वाद हीच माझी खरी ताकद आहे. हजारो बहिणींनी राखी बांधून व्यक्त केलेला विश्वास माझ्यासाठी अविस्मरणीय आहे. त्यांच्या सुख-दुःखात भावाप्रमाणे सदैव उभा राहण्याचा माझा प्रयत्न राहील, असे आ. राणा म्हणाले.कार्यक्रमात उपस्थित महिलांनी गीत व कविता सादर करून आ. रवि राणा यांच्या कार्याचे तसेच महिलांप्रती असलेल्या जिव्हाळ्याचे कौतुक केले. शंकरनगर परिसरात दिवसभर उत्साहाचे वातावरण होते.या सोहळ्याला उपमहापौर सचिन भेंडे, गटनेते नाना आमले, नगरसेवक प्रशांत वानखडे, अजय जयस्वाल, नगरसेविका सुमती ढोके, शिक्षण सभापती ड. प्रिती रेवणे, नगरसेविका अर्चना पांडे, रजनी डोंगरे, गौरी मेघवानी, नगरसेवक योगेश विजयकर, नगरसेविका मीरा कांबळे यांच्यासह महिला जिल्हाध्यक्षा सोनाली नवले, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि हजारो महिला उपस्थित होत्या.

# अमरावती जिल्ह्यातील ५५० ग्रामपंचायत प्रशासकांचा कार्यकाळ संपला

## पुढील प्रशासकीय व्यवस्थेसाठी सीईओंचे शासनाकडे मार्गदर्शन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

अमरावती जिल्ह्यातील सुमारे ५५० ग्रामपंचायतींच्या प्रशासकांचा कार्यकाळ संपुष्टात आला आहे. सार्वत्रिक निवडणुकांना अद्याप वेळ असल्याने, पुढील प्रशासकीय व्यवस्थेबाबत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) सत्यम गांधी यांनी राज्य शासनाकडे मार्गदर्शन मागवले आहे. यासंदर्भात अद्याप कोणताही निर्णय आलेला नाही, त्यामुळे ग्रामपंचायतींचा कारभार कोण पाहणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

जिल्ह्यातील या साडेपाचशे ग्रामपंचायतींचा कार्यकाळ सहा महिन्यांपूर्वीच संपला होता. त्यावेळी ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षणाची मर्यादा आणि नामाप्र (ओबीसी व व्हीजे-एनटी) आरक्षणाचा मुद्दा न्यायालयात असल्याने सार्वत्रिक निवडणुका होऊ शकल्या नाहीत. त्यामुळे शासनाने सरपंचांनाच सहा महिन्यांसाठी प्रशासक म्हणून नियुक्त केले होते.गेल्या आठवड्यात या प्रशासकांचा कार्यकाळही संपुष्टात आला आहे. प्रशासकांनी मुदतवाढीची मागणी केली असली तरी, त्यावर अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही. यामुळे प्रशासनासमोर ग्रामपंचायतींचा कारभार कसा चालवावा, असा पेच निर्माण झाला आहे.

या पार्श्वभूमीवर, अमरावती जिल्ह्यातील मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींच्या पुढील प्रशासकीय व्यवस्थेबाबत काय करावे, यासाठी ग्रामविकास विभागाच्या सचिवांसोबत प्रशासकांनी पत्रव्यवहार केला होता. मात्र, शासनाकडून अद्याप कोणतेही मार्गदर्शन प्राप्त झालेले नाही. त्यामुळे ज्यांचा कार्यकाळ संपला आहे, ते माजी सरपंच जिल्हा परिषद मुख्यालयात चौकशीसाठी येत आहेत.




या कायदेशीर पेचप्रसंगामुळे ग्रामपंचायतींचा दैनंदिन कारभार अडचणीत आला आहे. सध्या अनेक ग्रामपंचायती प्रशासकांविना आहेत. निवडणुका होईपर्यंत या ग्रामपंचायती कोणाच्या माध्यमातून चालणार आणि प्रशासक म्हणून कोणाची नियुक्ती होणार, याबाबत अनिश्चितता कायम आहे.ग्रामपंचायत ही ग्रामीण भागातील नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी थेट संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेची महत्त्वाची पायरी आहे. पाणीपुरवठा, स्वच्छता, दिवाबत्ती, रस्ते, विविध विकासकामे आणि शासकीय योजनांसाठी सक्षम प्रशासकीय व्यवस्था असणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रशासक नियुक्तीबाबतची ही अनिश्चितता लवकर दूर होणे गरजेचे असल्याची भावना ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.याबाबत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी यांनी सांगितले की, प्रशासकांचा कार्यकाळ संपुष्टात आल्याने तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या आहेत. ग्रामस्थांनाही त्यांच्या गावांचा प्रशासक कोण, याबाबत उत्सुकता आहे. या पार्श्वभूमीवर शासनाकडून मार्गदर्शन मागविण्यात आले आहे. शासनाच्या आदेशानुसार पुढील कारवाई केली जाईल.

### मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजना २.०४०८ मेगावॅट क्षमतेचे सौर प्रकल्प कार्यान्वित झाल्याने

# परिमंडळातील दोन लाख ३१ हजार शेतकऱ्यांना दिवसा हक्काची वीज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ अमरावती**

मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत अमरावती परिमंडळात विकेंद्रीत सौर प्रकल्पांच्या उभारणीला मोठी गती मिळाली आहे. परिमंडळात आतापर्यंत ९१ उपकेंद्रासाठी ४०८ मेगावॅट सौर ऊर्जा निर्मिती होत असून परिमंडळातील अमरावती आणि यवतमाळ जिल्ह्यातील तब्बल २ लाख ३१ हजार शेतकरी ग्राहकांना शेतीसाठी दिवसा सुरळीत वीज पुरवठा सुरू झाला आहे. अशी माहिती मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी दिली.



शेतकऱ्यांचे दिवसा विजेचे स्वप्न पूर्ण करणारी शासनाची ही महत्वाकांक्षी योजना असून, या योजनेअंतर्गत महावितरणच्या ३३ केव्ही क्षमता असलेल्या १८७ उपकेंद्रांसाठी विकेंद्रीत ७२९ मेगावॅट वीज निर्मितीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.महावितरणचे व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यात या योजनेच्या कामाला वेग देण्यात आला असून, परिमंडळाच्या निर्धारित उद्दिष्टापैकी सुमारे ५७ टक्के (४१५ मेगावॅट) काम पूर्ण झाले आहे. या सौर ऊर्जेचा थेट पुरवठा जवळच्या उपकेंद्रांद्वारे शेतकऱ्यांना सिंचनासाठी केला रात्रीच्या वेळी जीव धोक्यात घालून शेतात जाण्याची गरज पूर्णपणे संपली असून, दिवसा हक्काची वीज मिळाल्याने त्यांच्या पीक पद्धतीतही सकारात्मक बदल दिसून येत आहेत.परिमंडळाअंतर्गत जिल्हानिहाय कामगिरीचा विचार करता, अधीक्षक अभियंता दिपक देवहाते यांच्या पुढाकाराने अमरावती जिल्ह्यात महावितरणच्या ३३/११ केव्हीच्या ९१ उपकेंद्रासाठी ३२८ मेगावॅट वीज निर्मितीचे लक्ष्य असून ३८ उपकेंद्रासाठी सौर प्रकल्प पूर्ण होवून १५४ मेगावॅट वीज निर्मिती होत आहे. याचा लाभ जिल्ह्यातील १ लाख २२ हजार शेतकऱ्यांना मिळत आहे. तसेच अधीक्षक अभियंता रूपेश टेंभुर्णे यांच्या पुढाकारातून यवतमाळ जिल्ह्यात ९७ उपकेंद्रासाठी ४०१ मेगावॅट ऊर्जा निर्मितीचे लक्ष्य आहे आणि ५५ उपकेंद्रासाठी विकेंद्रीत सौर प्रकल्प सुरू झाले असून त्या प्रकल्पातून २६१ मेगावॅट वीज निर्मिती होत असल्याने, परिसरातील १ लाख ९ हजार शेतकऱ्यांची दिवसा विजेची सोय झाली आहे. उर्वरित प्रकल्पांचे कामही वेगाने पूर्ण करून सर्व शेतकऱ्यांना या योजनेच्या छत्राखाली आणण्याचा महावितरणचा प्रयत्न आहे.

# दर्यापूर बाजारपेठेत मुगाच्या शेंगांची आवक

## प्रति किलोमागे १०० रुपये भाव, 'सोल्याची भाजी' खरेदीसाठी नागरिकांची गर्दी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८दर्यापूर-**



विदर्भातील हिवाळी खाद्यसंस्कृतीचा भाग असलेल्या मुगाच्या शेंगांची आवक दर्यापूर बाजारपेठेत सुरू झाली असून, सध्या या शेंगांना तब्बल १०० रुपये किलो भाव मिळत आहे. स्थानिक पातळीवर मुगाचे उत्पादन घटल्याने परराज्यातून शेंगा आणल्या जात असून, 'सोल्याची भाजी' खरेदी करण्यासाठी नागरिकांची गर्दी होत आहे. दर्यापूर शहरातील विविध ठिकाणी सध्या मुगाच्या शेंगा विक्रीसाठी उपलब्ध झाल्या आहेत. या शेंगांना शहरासह ग्रामीण भागातूनही चांगली मागणी आहे. विशेषतः ग्रामीण भागातील शेतकरी व मजूर वर्गात मुगाच्या शेंगांची 'सोल्याची भाजी' आवडीने खाल्ली जाते. त्यामुळे बाजारात आवक होताच नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात खरेदी केली जात आहे. मात्र, गेल्या काही वर्षांत विदर्भातील मुगाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घटले आहे. त्यामुळे स्थानिक बाजारपेठेतील मागणी पूर्ण करण्यासाठी परराज्यातून मुगाच्या शेंगा आणाव्या लागत आहेत. स्थानिक उत्पादन घटल्याने नागरिकांना पूर्वी सहज उपलब्ध होणाऱ्या या भाजीसाठी आता चढे दर मोजावे लागत आहे. वातावरणातील बदलाचा परिणाम मुगाच्या उत्पादनावर होत असून, विदर्भातील हे पीक हळूहळू कमी होत असल्याचे शेतकरी सांगतात. त्यामुळे स्थानिक पातळीवर मुगाचे उत्पादन वाढविण्यासाठी योग्य नियोजन व मार्गदर्शनाची गरज व्यक्त होत आहे.

# खरीप हंगामासाठी खतांचा पुरवठा सुरळीत ३४ हजार ४६२ मेट्रीक टन युरीयाचा पुरवठा

## खतांच्या अनधिकृत दरवाढीबाबत जिल्ह्यात एकही लेखी तक्रार नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ अमरावती,**

खरीप हंगामासाठी जिल्ह्यात खतांचा पुरवठा सुरळीत झाला असून १२ ऑगस्ट २०२६ पर्यंत ३४ हजार ४६२ मेट्रीकटन (मे.ट.) युरिया, १० हजार २७० मे. ट. डिएपी, ५ हजार ३७४ मे.ट. एमओपी, ४५ हजार ७९९ मे.ट. संयुक्त खते आणि २० हजार ५२६ मे. ट. एसएसपी खतांचा पुरवठा झाल्याचे जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते यांनी सांगितले असून युरीया व डिएपी खतांच्या तुटवडयाबाबत वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित वृत्तांबाबत अधिकृत स्पष्टीकरण दिले आहे. खरीप हंगामात खतांच्या अनधिकृत दरवाढीबाबत जिल्ह्यात आजपर्यंत कोणतीही लेखी तक्रार प्राप्त झाली नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.जिल्ह्यात एप्रिल महिन्यात खतांच्या रॅक लागण्यास विलंब झाला मात्र लवकरच पुरवठा सुरळीत करण्यात आला. रासायणीक खतांच्या किमंतीत कोणतीही वाढ झाली नाही. विशेषत: केंद्र शासन युरीयाच्या किंमती नियंत्रीत करीत असल्याने त्याच्या किंमतीत दरवाढ झालेली नाही. तसेच डिएपीच्या किमंतीत वाढ नाही. फोस्फेटिक आणि पोटॅशिक खतांच्या बाबतीत केंद्र शासनाचे पोषणतत्व आधारीत अनुदान लागू असल्याने किंमतीत वाढ झाली नाही. संयुक्त खतांच्या किंमतीत वाढ झाली असली तरी सर्व रासायणीक खतांच्या किंमतीत सरसकट प्रति बॅग १२५ ते ३०० रुपयांनी वाढ झालेली नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. खरीप हंगाम २०२६-२७ मध्ये शेतकऱ्यांना उच्च दर्जाच्या कृषी निविष्ठा रास्त दरात उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा स्तरीय कृषी निविष्ठा सनियंत्रण समिती स्थापन करण्यात आली. जिल्हा स्तरीय भरारी पथक स्थापन करुन कृषी सेवा केंद्रांची नियमीत तपासणी करण्यात आली. लिंकींग व तत्सम तक्रारींबाबत जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालयात शेतकरी तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. तक्रार निवारणासाठी कृषी सेवा केंद्रांमध्ये क्यु.आर.कोड आणि बियाणे,खते व किटकनाशक संदर्भातील तक्रारींकरिता व्हाट्सप लावण्यात आला.

### वादग्रस्त वक्तव्य भोवले:

# नितेश कराळे मास्तर यांना न्यायालयीन कोठडी, कारागृहात रवानगी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ वर्धा-** आपल्या बेधडक आणि विनोदी भाषणशैलीमुळे संपूर्ण राज्यभरात लोकप्रिय असलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) प्रदेश प्रवक्ते नितेश कराळे मास्तर यांना वर्धा शहर पोलिसांनी गुरुवारी पहाटे ताब्यात घेतले. त्यानंतर दिनांक २७ ऑगस्ट रोजी त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले. सुनावणीदरम्यान न्यायालयाने त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावल्याने त्यांची रवानगी आता थेट कारागृहात करण्यात आली आहे.



कराळे मास्तर यांनी कुंभमेळा आणि साधूबाबत एक कथित वादग्रस्त वक्तव्य केले होते. त्यांच्या या वक्तव्यावरून विविध स्तरातून संतप्त प्रतिक्रिया उमटल्या होत्या. याप्रकरणी धार्मिक भावना दुखावल्याचा ठपका ठेवत 'विश्व हिंदू परिषदे'ने (विहिंप) पोलिसांत अधिकृत तक्रार दाखल केली. या तक्रारीची गंभीर दखल घेत वर्धा शहर पोलिसांनी कराळे मास्तर यांच्यावर संबंधित कलमानुसार अजामीनपात्र गुन्हा दाखल करून तपास सुरू केला होता. याच तपासाचा भाग म्हणून गुरुवारी पहाटे पोलिसांनी त्यांना ताब्यात घेत ही धडक कारवाई केली.न्यायालयाने कराळे मास्तर यांना न्यायालयीन कोठडी सुनावल्याने या कारवाईचे तीव्र पडसाद राजकीय वर्तुळात उमटण्याची शक्यता आहे. त्यांच्या अटकेची बातमी वाऱ्यासारखी पसरताच त्यांच्या समर्थकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकरणावरून आगामी काळात राजकीय आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडण्याची दाट शक्यता आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाथा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# ‘एआय’ बातमीच्या तोतया पत्रकारांचा जिल्ह्यात धुमाकूळ

## अधिकृत पत्रकार त्रस्त; अघटीत घडण्यापूर्वी यांना आवरण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

निवेदन व तक्रारींचा मजकूर एआय म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने संगणक किंवा मोबाईलवर बातमी स्वरुपात बनवून ती त्वरित व्हायरल करण्याचा प्रकार सध्या अमरावती जिल्ह्यात चांगलाच वाढला आहे. यामुळे दैनिक वृत्तपत्राच्या खऱ्या बातमीवर परिणाम पडून वाचकांची सोबतच नागरिकांची दिशाभूल केली जात आहे. हा गंभीर प्रकाराला आवरा अशी येथील पत्रकारांची मागणी आहे. जिल्हा माहिती कार्यालयाच्या सर्व नियमांना धाब्यावर बसवून काही पत्रकार छपाई न करताच कृत्रिम बुद्धीमत्तेच्या साह्याने ‘डिजिटल पेपर’ तयार करून सोशल मीडियावर व्हायरल करीत नागरिकांची दिशाभूल करीत आहेत. या प्रकारामुळे पत्रकारितेची विश्वासार्हता धोक्यात येत असून, प्रामाणिक पत्रकारांनाही बदनाम केले जात आहे. त्यामुळे जिल्हा माहिती कार्यालयाने डोळेझाक न करता अशा नियमबाह्य प्रकारांची तातडीने चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई आणि गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी आहे. एआयमधून बातमी तयार करून ‘खोट बोला पण रेटून बोला’ अशा तोतया पत्रकारांनी वैताग आणलाय. यांच्या भामटेगिरी प्रकारांची शहरात सध्या जोरदार चर्चा सुरु आहे. कोणतीही अधिकृत आरएनआय नोंदणी अथवा संबंधित माध्यमाची स्पष्ट ओळख नसतानाही काही व्यक्ती स्वतःला पत्रकार, संपादक किंवा प्रतिनिधी म्हणून सादर करून शासकीय कार्यालयांमध्ये बिंदास प्रवेश करीत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. एवढेच नव्हे, तर अधिकार्!यांवर दबाव टाकणे, एखाद्या प्रकरणाची भीती दाखवून बातमी प्रसिद्ध करण्याची धमकी देणे अथवा वैयक्तिक स्वरूपाचे कामे करून घेण्यासाठी पत्रकारितेच्या नावाचा वापर केला जात असल्याचा आरोपही आहे.पत्रकारिता ही लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. जनतेचे प्रश्न शासनाच्या निदर्शनास आणून देणे, प्रशासनाला जाब विचारणे आणि



(एआय निर्मित छायाचित्र)

### पत्रकार परिषदेला पत्रकारांचा उच्चांक

कही दिवस आधी कोणतीही पत्रकार परिषद असली तर फारसा १५ ते २५ जण उपस्थित राहायचे मात्र आता एखादी पत्रकार परिषदेचे आयोजन असेल तर त्या ठिकाणी किमान ४० ते ५० पत्रकार उपस्थित असतात यात तोतया पत्रकारांची सांख्याच अधिक असते हे विशेष.

गैरप्रकार उघडकीस आणणे, ही पत्रकाराची जबाबदारी आहे. या जबाबदारीचे भान ठेवून येथे अनेक पत्रकार काम करीत आहेत. मात्र एआयची बातमी किंवा अधिकृत वृत्तपत्र नसताना डिजिटल बातमी म्हणून व्हायरल होत असल्याने दुसर्!या दिवशी दैनिक वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या बातमीचे महत्त्व कमी होत आहे. हा गंभीर विषय संबंधितांनी दुर्लक्ष केल्यास याचा दुष्परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही.

जनसंपर्क व पोलिस प्रशासनाने दखल घ्यावी जिल्हा माहिती कार्यालय तथा जनसंपर्क विभागाने जिल्ह्यात कार्यरत असल्याचा दावा करणार्!या प्रिंट व डिजिटल माध्यमांची आणि त्यांच्या प्रतिनिधींची वस्तुनिष्ठ पडताळणी करावी, अशी मागणी होत आहे. पत्रकार म्हणून ओळख सांगणार्!या प्रत्येक व्यक्तीला शासकीय कार्यालयांमध्ये अनधिकृत प्रवेश अथवा अधिकार्!यांवर दबाव आणण्याची मुभा देता येणार नाही. अधिकृत माध्यम आणि वैयक्तिक सोशल मीडिया पेज यातील फरक प्रशासनाने स्पष्टपणे जाहीर करणे आवश्यक आहे. पत्रकारितेच्या नावाखाली कोणाकडून धमकी, दबाव, खंडणीसदृश मागणी किंवा ब्लॅकमेलिंग होत असल्याची ठोस तक्रार प्राप्त झाल्यास पोलिस प्रशासनाने त्याची निष्पक्ष चौकशी करून कायद्यानुसार कारवाई करण्याची मागणी होत आहे.

# वाघाच्या हल्ल्यातील मृताच्या वारसाला नोकरी द्या!

## आरती वानखडे यांची मागणी, वनविभागाला प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ अमरावती :** ५जिल्ह्यातील मोर्शी तालुक्यातील भांबोरा शिवारात वाघाच्या हल्ल्यात ५५ वर्षीय शेतकरी चरणदास इखे यांचा मृत्यू झाल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतात काम करण्यासाठी गेलेल्या चरणदास इखे यांच्यावर वाघाने अचानक हल्ला केल्याची घटना घडली. या घटनेने भांबोरा परिसरातील शेतकरी आणि ग्रामस्थांमध्ये वाघाच्या दहशतीमुळे चिंतेचे वातावरण आहे.घटनेची माहिती मिळताच वनविभाग, पोलीस आणि स्थानिक प्रशासनाने घटनास्थळी धाव घेतली. अधिकाऱ्यांनी परिस्थितीची पाहणी करून आवश्यक कार्यवाही सुरू केली. दरम्यान, या दुर्दैवी घटनेची माहिती मिळताच स्थानिक नेत्या सौ. आरती राजेश वानखडे यांनी घटनास्थळी भेट देत मृत शेतकरी चरणदास इखे यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले.यावेळी सौ. आरती वानखडे यांनी वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झालेल्या शेतकऱ्याच्या कुटुंबीयांना शासकीय स्तरावर योग्य मदत मिळावी, तसेच मृताच्या वारसाला वनविभागात शासकीय सेवेत सामावून घेण्यात यावे, अशी ठाम मागणी प्रशासनाकडे केली. या मागणीची प्रशासनाने दखल घेत मृताच्या वारसाला तातडीने वनविभागात कंत्राटी तत्त्वावर रुजू करून घेण्याचे मान्य केले असून, त्यांना भविष्यात कायमस्वरूपी सेवेत सामावून घेण्याबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर पाठविण्याचे आश्वासन दिल्याची माहिती देण्यात आली.दरम्यान, भांबोरा शिवारात वाघाचा वावर असल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. शेतात कामासाठी जाणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, ग्रामस्थांनी या वाघाचा तात्काळ बंदोबस्त करण्याची मागणी केली आहे. वनविभागाने परिसरात गस्त वाढवून नागरिकांनी सतर्क राहावे, अशी मागणीही होत आहे.या घटनेमुळे वन्यजीवांचा वाढता मानवी वस्तीकडे वावर आणि शेतकऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. मृत शेतकरी चरणदास इखे यांच्या कुटुंबाला न्याय व तातडीची मदत मिळावी, तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी वनविभागाने प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी भांबोरा परिसरातील नागरिकांकडून करण्यात येत आहे.


### १० जवानांचे पथक तैनात

प्राथमिकदृष्ट्या हा हल्ला वाघिणीनेच केला असावा. वर्धा जिल्ह्यात काही दिवसांपूर्वी एका वाघिणीने हल्ला केला होता. संबंधित वाघिणीला पकडण्याची परवानगी वर्धा वन विभागाला मिळाली आहे.वाघिणीच्या शोधासाठी भांबोरा तसेच परिसरातील गावांमध्ये २४ तास गस्त सुरू करण्यात आली आहे. प्रत्येकी दहा जवानांचे पथक तैनात करण्यात आले असून, ड्रोन कॅमेऱ्यांच्या माध्यमातूनही शोधमोहीम राबवली जात आहे. – **मयुर भैलूमे,** एसीएफ मोर्शी.

# गणेश मंडळांसाठी वीज जोडणीची प्रक्रिया सोपी

## अधिकृत वीज जोडणी घेण्याचे महावितरणचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती** यंदाचा गणेशोत्सव निर्विघ्न आणि सुरक्षित वातावरणात साजरा करण्यासाठी सर्व गणेशोत्सव मंडळांनी वीज सुरक्षेची योग्य ती खबरदारी घ्यावी, तसेच उत्सव कालावधीत केवळ अधिकृत वीज जोडणीच (वीज कनेक्शन) घ्यावी, असे आवाहन ’महावितरण’कडून करण्यात आले आहे.





उत्सवाच्या काळात कोणतीही अप्रिय घटना वा दुर्घटना घडू नये याची खबरदारी घ्यावी. आगमन आणि विसर्जन मिरवणुकीदरम्यान रस्ते तसेच गल्लीबोळांतील विजेच्या तारांची (वीजवाहिन्या) उंची लक्षात घेऊनच गणेशमूर्तीची उंची व रथाची रचना निश्चित करावी.त्याचप्रमाणे मंडप आणि रोषणाईसाठी वीज संचाची मांडणी करताना सुरक्षेच्या नियमांचे पालन केले जावे. अपघात टाळण्यासाठी केवळ प्रमाणित आणि कुशल विजेच्या ठेकेदारांकडूनच हे काम करून घ्यावे.गणेश मंडळांसाठी वीज जोडणी घेण्याची प्रक्रिया महावितरणने अत्यंत सोपी केली आहे. मंडळांना महावितरणच्या अधिकृत मोबाईल ॲप किंवा ऑनलाईन संकेतस्थळावरून अर्ज करून त्वरित तात्पुरती वीज जोडणी मिळवता येणार आहे.सार्वजनिक सुरक्षेचा विचार करता कोणत्याही मंडळाने अनधिकृतपणे विजेचा वापर करू नये, तसेच विजेच्या तारा किंवा खांबांजवळ मंडप उभारताना पुरेशी काळजी घ्यावी, असेही महावितरणने स्पष्ट केले आहे. गणेश मंडळाची सजावट करतांना पर्यावरण पूरक ऊर्जेला प्रोत्साहन देण्यासाठी सौर ऊर्जा मंडप आणि एलईडी दिव्यांचा वापरातून वीज बचतीचा संदेश देणारी सजावट करण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.–

# सर्वच मोठ्या आस्थापनांचे फायर ऑडिट होणार !

## पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आदेश

### महिनाभरात फायर ऑडिट व फायर ड्रिल करण्याची प्रशासनाला तंबी,

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

जिल्ह्यातील सर्व मोठ्या आस्थापनांचे अग्निसुरक्षा व्यवस्थेचे परीक्षण वं आग प्रतिबंधक सराव एक महिन्याच्या आत पूर्ण करण्याचे निर्देश महसूल मंत्री तथा अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत.

जिल्हा स्त्री रुग्णालयातील (डफरीन) बालके मृत्यूच्या घटनेची अतिशय गंभीर दखल महसूलमंत्री व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे घेतली, ही घटना २४ ऑगस्ट रोजी पहाटे ३.३० वाजता घडल्यांनतर सकाळी चारवाजेपासून संबंधित सर्व यंत्रणांशी संपर्क साधून

### आरोग्य आयुक्तांचा अहवाल सात दिवसांत येणारं



आवश्यक निर्देश दिले.या दुर्दैवी घटनेत ३ नवजात बालकांचा मृत्यू झाला. मृत बालकांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी रु. ५ लक्ष मदत जाहीर करण्यात आली. पालकमंत्री बावनकुळे यांच्या सुचनेनुसार एकूण ३६ नवजात बालकांना सुरक्षिततेच्या दृष्टीने इतर रुग्णालयांमध्ये उपचारासाठी हलविण्यात आले. त्यापैकी २९ नवजात बालकांना पुढीलप्रमाणे विविध रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात आले. डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अमरावती ११, डॉ. मुरके रुग्णालय,अमरावती ८, होप रुग्णालय, अमरावती ८, पारिजात रुग्णालय दोन अशा २९ नवजात बालकांवर विनामूल्य उपचार करण्याबाबत निर्देश दिले असुन त्यांचा मोफत उचार सुरु आहे. तसेच ७ नवजात बालके त्यांच्या मातांसोबत जिल्हा स्त्री रुग्णालयात वैद्यकीय देखरेखीखाली सुरक्षित आहेत.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आरोग्यमंत्री व-आरोग्य सचिवाना तातडीने घटनास्थळी पाहणी करण्यासाठी पाठविले होते. त्यांनी दुपारी १.३० वाजता घटनास्थळाची पाहणी केल्यानंतर आरोग्य आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली दहा सदस्यीय समिती गठित करण्यात आली.


# नेपाळमध्ये अडकलेले अमरावतीचे ४ तरुण सुखरूप

## दोन दिवसांनी संपर्क, प्रशासनाकडून मदतीचे आश्वासन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ अमरावती–** नेपाळमध्ये अडकलेल्या भारतीयांमध्ये अमरावती येथील निवासी श्याम मारोडकर आणि त्याच्या चार मित्रांचा समावेश असल्याची माहिती समोर आली आहे. श्यामचे काका गौरव मारोडकर यांनी गुरुवारी जिल्हाधिकारी कार्यालयातील मदत कक्षात पोहोचून हे सर्वजण सुखरूप असल्याची पुष्टी केली.

गौरव मारोडकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, श्याम आणि त्याचे इतर तीन मित्र नेपाळमध्ये फिरायला गेले होते. प्रवासात त्यांना आणखी काही महाराष्ट्रीयन तरुण भेटले. दोन दिवसांपूर्वी श्यामशी शेवटचा संपर्क झाला होता. त्यानंतर त्यांचा फोन लागत नसल्याने कुटुंबीयांची चिंता वाढली होती, विशेषतः नेपाळमध्ये नैसर्गिक आपत्ती आल्यामुळे ही चिंता अधिकच गडद झाली.

वारंवार प्रयत्न केल्यानंतर अखेर संपर्क साधला गेला आणि ते सर्वजण परतीच्या प्रवासाला लागल्याचे कळले. यामुळे कुटुंबीयांनी सुटकेचा निःश्वास टाकला. श्याम आणि त्याच्या मित्रांचे वय साधारणतः ३० वर्षे असून ते सध्या मायदेशी परतत आहेत.




गौरव मारोडकर यांनी शासनातर्फे त्यांना परतीच्या प्रवासासाठी काही मदत लागल्यास ती पुरवली जावी, अशी विनंती केली. प्रशासनाने या प्रवासात सहकार्य करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

दरम्यान, मदत कक्षात मिळालेल्या माहितीनुसार, अमरावती येथील कक्कड कुटुंबातील एक महिला देखील पर्यटनासाठी नेपाळला गेल्या होत्या. मात्र, त्या दोन दिवसांपूर्वीच नेपाळमधून बाहेर पडून दुसऱ्या देशात गेल्या आहेत. नेपाळमधील परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने टूर पॅकेजर्स आणि ट्रॅव्हल एजंट्सशी संपर्क साधून त्यांच्यामार्फत कोणी नेपाळला गेले आहे का, याची माहिती गोळा करण्यास सुरुवात केली आहे. गेल्या २४ तासांत केवळ एकच तक्रार प्राप्त झाली आहे.

नेपाळमध्ये निर्माण झालेल्या पूरस्थितीमुळे महाराष्ट्रातील नागरिकांसाठी मंत्रालयाने हेल्पलाईन क्रमांक जारी केले आहेत. मंत्रालयातील नियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत असून, मदतीची आवश्यकता असलेल्यांनी राज्य नियंत्रण कक्ष हेल्पलाईन– १०७० (टोल–फ्री), नियंत्रण कक्ष +९१–९३२१५८७१४३ किंवा लेपीौश्रीाारहरीरिहीर.सीं.ळप या ई–मेलवर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# शिल्पा गवारे मृत्यू प्रकरणाचा मुळापर्यंत जाऊन तपास करा

## कौटुंबिक छळाकडे डोळेझाक करणाऱ्यांचीही जबाबदारी निश्चित करा; हुंडाबळी कायद्यातील सात वर्षांच्या मर्यादेचा पुनर्विचार आवश्यक : डॉ. नीलम गोऱ्हे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ पिंपरी–चिंचवड,**

वाकड येथील शिल्पा सचिन गवारे यांच्या मृत्यू प्रकरणाचा कोणत्याही राजकीय, सामाजिक अथवा आर्थिक दबावाला बळी न पडता निष्पक्षपणे आणि मुळापर्यंत जाऊन तपास करावा. या प्रकरणातील प्रत्येक आरोपाची पुराव्यांच्या आधारे सखोल चौकशी करून सत्य परिस्थिती समोर आणावी, अशी मागणी विधान परिषद सदस्या तथा शिवसेना नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केली.

डॉ. गोऱ्हे यांनी शुक्रवारी वाकड पोलीस ठाण्याला भेट देत या प्रकरणातील तपासाची माहिती घेतली. यावेळी सांगली महिला आघाडी संपर्कप्रमुख सुनीता मोरे आणि लातूर संपर्क रंजना कुलकर्णी उपस्थित होत्या.शिल्पा गवारे यांचा माहेरच्या संपत्तीमध्ये हिस्सा मागितल्याच्या कारणावरून शारीरिक तसेच मानसिक छळ करण्यात आल्याचा आरोप त्यांच्या कुटुंबीयांकडून करण्यात आला आहे. या आरोपांकडे गांभीर्याने पाहून त्यामागील वस्तुस्थिती तपासणे आवश्यक असल्याचे डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले. केवळ प्राथमिक स्वरूपाच्या तपासावर न थांबता या प्रकरणाच्या प्रत्येक पैलूची सखोल चौकशी करावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.



### घटनेपूर्वीच्या पाच दिवसांचा तपशील तपासा

घटनेपूर्वीच्या पाच दिवसांत नेमक्या कोणत्या घटना घडल्या, शिल्पा यांचे माहेरच्या आणि सासरच्या व्यक्तींशी कोणते संवाद झाले, त्यांच्यात फोनवरून किंवा संदेशांद्वारे काय चर्चा झाली, याचा तपशील तपासात महत्त्वाचा ठरू शकतो. त्यामुळे कॉल रेकॉर्ड, मोबाईल संदेश, सीसीटीव्ही फुटेज, सोशल मीडिया संवाद, वैद्यकीय कागदपत्रे तसेच उपलब्ध तांत्रिक पुरावे तपासावेत, अशी सूचना डॉ. गोऱ्हे यांनी केली.

तसेच शिल्पा यांच्या संपर्कातील नातेवाईक, मैत्रिणी आणि परिचितांकडे या प्रकरणाशी संबंधित कोणती माहिती आहे, याचीही पोलिसांनी चौकशी करावी. घटनेपूर्वी त्यांच्या वर्तनात किंवा परिस्थितीत काही बदल जाणवला होता का, याचाही तपास करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

### छळाची माहिती असूनही गप्प राहणाऱ्यांचीही जबाबदारी

कौटुंबिक छळाची माहिती असतानाही त्याकडे डोळेझाक करणे किंवा पीडित महिलेला मदत न करणे ही गंभीर बाब आहे. छळाला प्रोत्साहन देणे, त्याला साथ देणे अथवा संबंधित व्यक्तीला संरक्षण देणे असे प्रकार तपासात आढळल्यास अशा व्यक्तींचीही जबाबदारी निश्चित करून कायदेशीर कारवाई करावी, असे डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले.

### हुंडाबळी कायद्यातील सात वर्षांच्या मर्यादेचा पुनर्विचार करा

दरम्यान, हुंडाबळीच्या कायद्यातील सात वर्षांच्या मर्यादेचा पुनर्विचार करण्याची आवश्यकता असल्याचे डॉ. गोऱ्हे यांनी म्हटले. विवाहाला सात वर्षांपेक्षा अधिक काळ झाल्यानंतरही महिलेला शारीरिक व मानसिक छळाला सामोरे जावे लागू शकते. त्यामुळे दीर्घकाळ सुरू असलेल्या कौटुंबिक छळामुळे महिलेचा मृत्यू झाल्यास दोषींवर कठोर कारवाई करता यावी, यासाठी कायद्यात आवश्यक बदल करण्याची गरज आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.या प्रकरणातील तपास तसेच आवश्यक कायदेबदलाबाबत मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना निवेदन देण्यात येणार असून, त्याबाबत पुढील काळात पाठपुरावा करणार असल्याचे डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सांगितले

राजकीय अथवा सामाजिक दबावाला बळी पडू नका

या प्रकरणातील तपासात कोणत्याही प्रकारचा राजकीय, सामाजिक अथवा आर्थिक दबाव येता कामा नये. संबंधित व्यक्तींची पदे, प्रतिष्ठा किंवा राजकीय लागेबांधे तपासाच्या आड येता कामा नयेत, असे डॉ. गोऱ्हे यांनी स्पष्ट केले. उपलब्ध पुराव्यांच्या आधारे दोषी व्यक्तींवर कठोर कायदेशीर कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली.

# अंजनसिंगी-पिंपळखुटा रस्त्यावर भीषण अपघात

## फोर व्हीलरची ऑटोला जोरदार धडक; ऑटोचालकासह पाच महिला गंभीर जखमी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ अंजनसिंगी** – चिचपूर येथून सालबर्डी दर्शनासाठी जात असलेल्या भाविकांच्या ऑटोला अंजनसिंगी-पिंपळखुटा रस्त्यावर समोरून येणाऱ्या फोर व्हीलरने जोरदार धडक दिल्याची घटना घडली. या भीषण अपघातात ऑटोचालकासह पाच महिला गंभीर जखमी झाल्या आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, चिचपूर येथून पाच महिला ऑटोने सालबर्डी येथे दर्शनासाठी जात होत्या. दरम्यान, अंजनसिंगी-पिंपळखुटा रस्त्यावर समोरून येणाऱ्या फोर व्हीलरने त्यांच्या ऑटोला जबर धडक दिली.




धडकेनंतर ऑटोमधील प्रवाशांना गंभीर दुखापत झाली. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तत्काळ ११२ क्रमांकावर संपर्क साधला. त्यानंतर जखमींना उपचारासाठी अंजनसिंगी सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, त्यांची प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी त्यांना अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले आहे. दरम्यान, अपघातानंतर फोर व्हीलर चालक घटनास्थळावरून फरार झाल्याची माहिती आहे. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळ पोलीस दाखल झाली असून , फरार वाहनचालकाचा शोध घेत आहेत. अपघात नेमका कशामुळे झाला, याचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# रक्षाबंधनाची खास भेट! 'माँ जिजाऊ'च्या २५ नवीन एसटी बसेस अमरावतीच्या सेवेत

## आ. रवी राणा यांनी स्वतः बस चालवून केले उद्घाटन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**
रक्षाबंधनाच्या पावन पर्वानिमित्त अमरावती जिल्ह्यातील महिला भगिनींसाठी राज्य सरकारकडून विशेष भेट देण्यात आली असून, जिल्ह्यासाठी तब्बल २५ नवीन 'माँ जिजाऊ' एसटी बसेस उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या बसेसमुळे ग्रामीण भागातील महिला, विद्यार्थी तसेच सर्वसामान्य प्रवाशांचा प्रवास अधिक सुरक्षित, सुलभ आणि सुविधाजनक होणार आहे. बडनेरा बस डेपो येथे नव्याने दाखल झालेल्या पाच एसटी बसेसच्या लोकार्पणाचा कार्यक्रम आमदार रवी राणा यांच्या हस्ते उत्साहात पार पडला.या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे आमदार रवी राणा यांनी स्वतः नवीन एसटी बसचे स्टेअरिंग हातात घेत बस




चालवून नव्या बससेवेचा शुभारंभ केला. यावेळी उपस्थित लाडक्या बहिणींना रक्षाबंधनाच्या हार्दिक शुभेच्छा देत त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अमरावती जिल्ह्यातील सर्व महिला भगिनींच्या वतीने आभार मानले.यावेळी बोलताना आमदार रवी राणा म्हणाले की, रक्षाबंधनानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महिला भगिनींना ही आगळीवेगळी भेट दिली आहे. अमरावती जिल्ह्यासाठी २५ नवीन एसटी बसेस उपलब्ध करून देण्यात आल्या असून, 'माँ जिजाऊ' या नावाने सुरू होणाऱ्या या बसेस महिला सक्षमीकरणासह सुरक्षित प्रवासाचे प्रतीक ठरतील. रक्षाबंधनाच्या दिवशी अनेक महिला आपल्या भावाला राखी बांधण्यासाठी गावागावांत प्रवास करतात. अशा वेळी त्यांना वेळेवर, सुरक्षित आणि आरामदायी प्रवासाची सुविधा मिळावी, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

या उपक्रमासाठी आमदार रवी राणा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे तसेच परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे विशेष आभार मानले. जिल्ह्यात दाखल झालेल्या २५ नवीन बसेसपैकी बडनेरा डेपोला मिळालेल्या पाच बसेस सेवेत दाखल झाल्याने परिसरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम होणार आहे.यावेळी एसटीचे डीसी सचिन शिरसागर, उपमहापौर सचिन भेंडे, गटनेते नाना आमले, नगरसेवक अजय जयस्वाल, किशोर जाधव, नगरसेविका रजनी डोंगरे, गौरी मेघवानी, मीरा कांबळे तसेच बडनेरा डेपो व्यवस्थापक पवन देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. याशिवाय अमोल मिलके, गजानन सावंत, हरभजन सिंग, पवन बिंदा, अमित यादव, रोशन नागोसे, मंगेश चव्हाण, वंदना पवार, पूजा दुबे, नीता शुक्ला, विनय घिमे, संदीप कांबळे, शैलेंद्र मेघवानी, आशिष कावरे, दिलीप पकडे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रक्षाबंधन सोहळ्यात भाजपकडून सामाजिक बांधिलकीचा जागर

# हजारो लाडक्या बहिणींनी खासदार डॉ. अनिल बोंडे व आमदार प्रविण पोटे पाटील यांना बांधल्या राख्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ अमरावती–** रक्षाबंधनाच्या पावन पर्वानिमित्त भारतीय जनता पार्टी, अमरावतीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या रक्षाबंधन सोहळ्यात भाऊ-बहिणीच्या नात्यासोबतच सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला. आमदार प्रविण पोटे पाटील यांच्या कॅम्प रोड येथील जनसंपर्क कार्यालयात आयोजित या सोहळ्याला अमरावती जिल्ह्यातील हजारो लाडक्या बहिणींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.



यावेळी हजारो लाडक्या बहिणींनी खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार प्रविण पोटे पाटील तसेच शिवराय कुळकर्णी, जयंत डेहनकर, चेतन गावंडे यांसह भाजप पदाधिकाऱ्यांना राखी बांधून शुभेच्छा दिल्या. प्रेम, विश्वास आणि जिव्हाळ्याच्या नात्याचे प्रतीक असलेल्या रक्षाबंधनाला सामाजिक संवेदनशीलतेची जोड मिळाल्याने हा सोहळा भावनिक आणि संस्मरणीय ठरला.

रक्षाबंधन सोहळ्याच्या निमित्ताने जिल्हा स्त्री रुग्णालयातील दुर्दैवी घटनेत आपले बाळ गमावलेल्या पुलगाव येथील पूजा स्वप्नील बोरगे यांच्या कुटुंबीयांना एक लाख रुपयांची आर्थिक मदत सुपूर्द करण्यात आली. तसेच मिसबा अमजद हुसेन आणि हिना तौसूद तस्लिम खान यांनाही आर्थिक मदत देण्यात आली. कठीण प्रसंगी पक्ष त्यांच्या कुटुंबीयांच्या पाठीशी खंबीरपणे उभा असल्याचा विश्वास यावेळी देण्यात आला.रक्षाबंधन हा केवळ प्रेमाचा उत्सव नसून सामाजिक बांधिलकी जपण्याचा दिवस आहे.

भगिनींनी दिलेला विश्वास ही आमच्यासाठी मोठी जबाबदारी आहे. गरजू कुटुंबांच्या सुख-दुःखात सदैव सहभागी राहून समाजसेवेचा हा प्रवास यापुढेही सुरू ठेवू, असे प्रतिपादन आमदार प्रविण पोटे पाटील व खासदार डॉ अनिल बोंडे यांनी केले.या सोहळ्याला खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार प्रविण पोटे पाटील, प्रदेश प्रवक्ते शिवराय कुलकर्णी, जयंतजी डेहनकर, चेतन गावंडे, चेतन पवार, नितीन गुडधे, राजेशपड्डा, महिला मोर्चा अध्यक्ष सुधाताई तिवारी, लताताई देशमुख, भारतीताई गुहे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

# भरधाव बलेनो कार थेट मेडिकलमध्ये घुसली; सुदैवाने जीवितहानी टळली




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती :**
शहरातील कठोरा नाका परिसरात एका भरधाव बलेनो कारचा चालकावरील ताबा सुटल्याने कार थेट आरोग्य भारती मेडिकलमध्ये घुसल्याची घटना घडली. या अपघातामुळे परिसरात काही काळ एकच खळबळ उडाली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.मिळालेल्या माहितीनुसार, कठोरा नाका परिसरातील रस्त्यालगत आरोग्य भारती मेडिकल आहे. मेडिकलचा परिसर रस्त्याच्या पातळीपेक्षा काहीसा खाली असल्याने भरधाव आलेल्या बलेनो कारवरील चालकाचे नियंत्रण सुटले. त्यानंतर कार थेट मेडिकलच्या शटरपर्यंत घुसली. अचानक घडलेल्या या घटनेमुळे मेडिकलमधील कर्मचारी तसेच परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.घटनेची माहिती मिळताच नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. अपघातानंतर कार अडकून पडल्याने ती बाहेर काढण्यासाठी क्रेनची मदत घेण्यात आली. अखेर क्रेनच्या माध्यमातून कार सुरक्षितपणे मेडिकलच्या परिसरातून बाहेर काढण्यात यश आले. अपघातात मेडिकलचे नुकसान झाले असले तरी सुदैवाने मोठी दुर्घटना टळली.

# ७२ कोटी रुपये वाचविण्यासाठी पुरस्कार स्पर्धाच गुंडाळली का?

## मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' स्पर्धेचा निकाल सात महिन्यांपासून प्रलंबित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**
शाळांचा शैक्षणिक व भौतिक दर्जा उंचावण्यासाठी मोठा गाजावाजा करीत सुरू करण्यात आलेल्या 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' स्पर्धेचा निकाल गेल्या सात महिन्यांपासून शासनाच्या दप्तरात अडकला आहे. फेब्रुवारीमध्ये मूल्यांकन प्रक्रिया पूर्ण होऊन सात महिने उलटले तरी अद्याप निकाल जाहीर करण्यात आलेला नाही. या स्पर्धेतील विजेत्या शाळांना सुमारे ७२.२२ कोटी रुपयांची बक्षिसे देण्यात येणार होती. ही बक्षिसांची रक्कम वाचविण्यासाठीच शासनाने स्पर्धेच्या निकालाकडे दुर्लक्ष केले आहे का, असा संतप्त सवाल सहभागी शाळांकडून उपस्थित केला जात आहे.शालेय शिक्षण विभागाच्या वतीने गेल्या तीन वर्षांपासून या स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. शहर विभागात तालुका, जिल्हा आणि महानगरपालिका स्तरावर एकूण २४६ शाळांना, तर ग्रामीण भागात तालुका, जिल्हा आणि विभाग स्तरावर २,३५८ शाळांना पुरस्कार देण्यात येतात. याशिवाय राज्यस्तरावर आणखी सहा शाळांची निवड केली जाते. अशा प्रकारे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाच्या पुरस्कारांसाठी एकूण २,६१० शाळा बक्षिसासाठी पात्र ठरतात.निकालाच्या प्रतीक्षेत असलेल्या शाळा व्यवस्थापन समित्या, मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांमध्ये नाराजी वाढत आहे. निकाल जाहीर करण्यास होत असलेल्या विलंबामुळे शाळांच्या पुढील शैक्षणिक नियोजनावरही परिणाम होण्याची चिंता व्यक्त केली जात आहे.

### निकाल तातडीने जाहीर करण्याची मागणी

शासनाने निकालाला होत असलेल्या विलंबाचे कारण स्पष्ट करून स्पर्धेचा निकाल तातडीने जाहीर करावा आणि पात्र शाळांना नियमानुसार पुरस्काराची रक्कम वितरित करावी, अशी मागणी राजेश सावरकर, राज्य प्रसिद्धी प्रमुख, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती यांनी केली आहे.-

# रक्षणकर्त्यांच्या मनगटावर नवनीत राणांची राखी

## जवानांच्या समर्पणाला मनापासून सलाम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**
रक्षाबंधनाच्या पावन पर्वानिमित्त भाजपा नेत्या तथा माजी खासदार नवनीत राणा यांनी आपल्या सुरक्षेसाठी सदैव तत्पर असलेल्या केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाच्या (उखडऋ) जवानांना, अंगरक्षकांना तसेच महाराष्ट्र पोलीस विभागातील जवानांना राख्या बांधून व औक्षण करून रक्षाबंधनाच्या शुभेच्छा दिल्या. देशाच्या आणि नागरिकांच्या सुरक्षेसाठी अहोरात्र कर्तव्य बजावणाऱ्या रक्षणकर्त्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने हा भावनिक उपक्रम राबविण्यात आला.रक्षाबंधन हा केवळ भाऊ-बहिणीच्या प्रेमाचा सण नसून, परस्पर रक्षण, विश्वास आणि आपुलकीची भावना दृढ करणारा पवित्र सण असल्याचे नवनीत राणा यांनी यावेळी सांगितले. जवानांशी संवाद साधत त्यांनी त्यांच्या कर्तव्यनिष्ठेचे आणि समर्पणाचे कौतुक केले.देशाच्या सुरक्षेसाठी जवान दिवस-रात्र तत्पर असतात. ऊन, वारा, पाऊस किंवा कोणतीही परिस्थिती असो, ते आपल्या कर्तव्यापासून कधीही मागे हटत नाहीत. माझ्या सुरक्षेसाठी तसेच



देश आणि नागरिकांच्या सुरक्षेसाठी अहोरात्र सेवा देणाऱ्या प्रत्येक जवानाच्या समर्पणाला मी मनापासून सलाम करते, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.सुरक्षा व्यवस्था सांभाळताना अनेक जवानांना सण-उत्सवाच्या काळातही कुटुंबीयांपासून दूर राहून कर्तव्य बजावावे लागते. त्यामुळे त्यांच्या मनगटावर राखी बांधून त्यांच्या सेवेला सन्मान देण्याचा हा उपक्रम विशेष ठरला.यावेळी नवनीत राणा यांनी महिला सक्षमीकरणासाठी राज्य आणि केंद्र सरकार सातत्याने पुढाकार घेत असल्याचेही नमूद केले. रक्षण करणाऱ्या हातांप्रती कृतज्ञता व्यक्त करणे हीच खरी रक्षाबंधनाची भावना आहे, असे त्या म्हणाल्या.

# वन विभागात वरिष्ठांची 'मर्जी'; मोजक्याच अधिकाऱ्यांवर अतिरिक्त कार्यभाराची 'कृपा', नियमांना छेद!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती** वन विभागातील महत्त्वाच्या पदांचा अतिरिक्त कार्यभार सोपवताना ज्येष्ठता आणि पात्रतेला बगल देऊन 'वैयक्तिक समीकरणांना' प्राधान्य दिले जात असल्याची धक्कादायक चर्चा सध्या वन वर्तुळात रंगली आहे. अनेक महत्त्वपूर्ण आणि धोरणात्मक पदांचा कार्यभार मोजक्याच अधिकाऱ्यांच्या खांद्यावर सोपविण्यात आल्याने, वन विभागात नक्की चाललंय काय?, असा प्रश्न उपस्थित केला जात असून पारदर्शक कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

सध्या वन विभागातील अतिशय संवेदनशील आणि महत्त्वाच्या पदांची सूत्रे केवळ दोन ते तीन वरिष्ठ अधिकाऱ्यांकडेच एकवटली आहेत. नागपूर येथील पूर्व वनजीव विभागाचे अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक मुकुल त्रिवेदी यांच्याकडे सध्या एपीसीसीएन (संवर्धन), एपीसीसीएफ (मानव संसाधन व्यवस्थापन), एपीसीसीएफ (कॅम्पा) या अत्यंत महत्त्वाच्या पदांसह 'महाराष्ट्र इको टुरिझम डेव्हलपमेंट बोर्ड'च्या व्यवस्थापकीय संचालक पदाचाही अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला आहे. एकाच अधिकाऱ्याकडे एवढ्या मोठ्या जबाबदाऱ्या सोपविल्याने मूळ पदाच्या कामावर परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

दुसरीकडे, वन दलाचे प्रमुख एम. श्रीनिवास राव यांनी देखील अनेक महत्त्वाच्या पदांचा अतिरिक्त कार्यभार स्वतःकडेच ठेवला आहे. यामध्ये एपीसीसीएफ आणि पीसीसीएफ (कर्मचारी वर्ग-पर्सनल) या पदांचा समावेश आहे. इतकेच नव्हे तर, वन विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या 'वन विकास महामंडळाच्या' व्यवस्थापकीय संचालक पदाचा अतिरिक्त कार्यभारही राव हेच सांभाळत आहेत. या अतिरिक्त कार्यभाराच्या वाटपामध्ये एक ठळक आणि विशिष्ट पद्धत दिसून येत असल्याची चर्चा अधिकाऱ्यांमध्ये दबक्या आवाजात सुरू आहे. अनेक महत्त्वाच्या पदांचा कार्यभार वन दल प्रमुखांनी एकतर स्वतःकडे ठेवला आहे किंवा ज्यांच्याशी त्यांचे 'मधुर' कार्यसंबंध आहेत, अशाच मोजक्या अधिकाऱ्यांकडे तो सुपूर्द करण्यात आला आहे. यामुळे प्रशासकीय वर्तुळात तीव्र नाराजी पसरली आहे.

# शिक्षक नेत्या डॉ. संगीता शिंदे यांनी बांधली खासदार डॉ. अनिल बोंडे यांना राखी

### मिळाला शिक्षक आमदार होण्याचा आशीर्वाद..

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ अमरावती** रक्षाबंधन सणाच्या पार्श्वभूमीवर अमरावतीत एक महत्त्वाकांक्षी कौटुंबिक व राजकीय स्नेह पाहायला मिळाला. शिक्षक नेत्या डॉ. संगीता शिंदे यांनी भाजप खासदार डॉ. अनिल बोंडे यांना राखी बांधून रक्षाबंधन साजरे केले.या वेळी बोलताना खासदार अनिल बोंडे यांनी, संगीता शिंदे या शिक्षकांच्या प्रश्नांसाठी अहोरात्र धडपडत आहेत, असे सांगत आपल्या या बहिणीला शिक्षक आमदार होण्याचा आशीर्वाद दिला.



तर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मोठे भाऊ म्हणून शिक्षकांचे प्रश्न समजून घेतात अशी भावना डॉ. संगीता शिंदे यांनी व्यक्त केली.


सांध्य मराठी दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
अमरावती येथून प्रकाशित
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
धन्यवाद वाचकांनो!
25 लाख वाचकांनी
आमच्या साईड ला भेट दिल्याबद्दल
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
मुख्य पृष्ठ
अमरावती
विदर्भ
महाराष्ट्र
देश-विदेश
ब्रेकिंग न्यूज
अमरावतीत विकासकामांचा धडाका
पावसाचा जोर वादला
शेतकऱ्यांसाठी महत्वाची बातमी
राज्यातील राजकीय घडामोडी
क्रीडा क्षेत्रातील ताज्या बातम्या
HTTPS://E PAPER.VIDARBHAPRAJASATTAK.COM
आपल्या परिसरातील बातम्या व राज्यभरातील ताज्या घडामोडी
वाचा आता आमच्या सोबत
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
आमच्या चॅनल ला आजच जॉईन व्हा!
स्थानिक बातम्यांवर विशेष भर
राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व कृषी बातम्या
फोटो व व्हिडिओ सह अपडेट
तत्काळ व विश्वसनीय बातम्या
मो. 8605948853
Follow Us On :